
आर्थिक विकास :
एक चिंतन
डॉ. शेख फारूक नजीर
श्रीमती उस्मानी तय्यबा हिशाम

संदर्भ ग्रंथ -

१) रुद्र दत्त, के.पी.एम. सुन्दरम, "भारतातील अर्थव्यवस्था" (२००९), एस. चन्द ॲण्ड कंपनी लि., रामनगर, नई दिल्ली.
२) अतिरिक्तांक, प्रतियोगिता दर्पण, "भारतीय अर्थव्यवस्था" (२०१२-१३).
३) वी.सी. सिन्हा एवं पुष्पा सिन्हा, "जनांकिकी के सिध्दांत" (२००६), मयूर पेपरबैक्स, नोएडा. ISBN ८१-७१९८-११३-५.
४) डॉ. वंदना सोनाळकर, "औरंगाबादमधील वाळूज औद्योगिक वसाहतीतील स्थलांतरीत जनसमूहांचा लिंगभाव परिप्रेक्ष्यातून एक अभ्यास" (२०१०).
५) धनसरे गोविंद, "जागतिकीकरण आणि शेतकऱ्यांचे प्रश्न," मुंबई, महाराष्ट्र राज्य किसान सभा, पृ. २९.
6) Tejaswini Pagadala, "Bharat to India : Understanding Rural- Urban Migration (Research Paper)."
७) सिविल सर्विसेज क्रॉनिकल, अप्रैल २०१०, २०११.
८) कुरुक्षेत्र, फरवरी २०१२.

❖❖❖



# बालकामगार समस्या : एक चिंतन

घेवारे निलांबरी शिवमूर्ती
संशोधक विद्यार्थिनी, अर्थशास्त्र विभाग,
डॉ. बा. आं. म. वि., औरंगाबाद.
भ्रमणध्वनी-९१५८७४७१११

प्रा. फुलारी व्ही.एस.
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
श्री. मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर.
भ्रम.-९०९६६१४७१०

**प्रस्तावना :**

२१ व्या शतकात भारतीय अर्थव्यवस्थेला शाइनिंग इंडिया म्हणून संबोधले जात आहे. परंतु दुसरीकडे सफरिंग इंडियातील भीषणग्रस्त समस्या जलद गतीने वाढत आहेत. एकीकडे संख्यात्मक विकासाच्या आकडेवारीवरुन इकोनॉमिक ग्रोथ सांगितली जात आहे. तर दुसरीकडे आजही गुणात्मक आर्थिक विकासापासून सशक्त भारत लांब आहे, ही एक समस्याग्रस्त बाब आहे. एकीकडे झपाट्याने वाढणारी भारतीय अब्जाधीशांची संख्या, त्यांचा व्यापार विस्तार, विदेशी कंपन्यांवर वाढणारी त्यांची मालकी, तर दुसरीकडे त्याहीपेक्षा मोठ्या प्रमाणावर खेडेगावात फोफावणारे दारिद्र्य व जीवनमानाची दुर्दशा, शेतकऱ्यांच्या प्रचंड प्रमाणावर होत असणाऱ्या आत्महत्यांनी निर्देशित ग्रामीण अर्थव्यवस्थेची होत चाललेली धुळधाण तसेच पाच मुलांपैकी एक बालकमगार, जन्मतः चारपैकी एक कुपोषित व जन्माआधी व जन्मनंतर स्त्रीभ्रूण हत्या हे वर्तमान व भविष्याचे चित्र. एकीकडे शासनाचे शैक्षणिक पातळी वाढविण्याचे ध्येय तर दुसरीकडे दारिद्र्य व कुटुंबाच्या मोठ्या आकारामुळे वर्गात अनुपस्थित राहून तोच विद्यार्थी पोटाची खळगी भरण्यासाठी गटारी साफ करताना, एकीकडे बालकामगारांचा जगभर विरोध, तर दुसरीकडे उत्पादन व्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक म्हणून उत्पादित वस्तूंचा स्वस्त श्रमातील बालकामगार, एकीकडे देशाचे भवितव्य ज्या बाल्यावर तर दुसरीकडे त्याच बाल्याचे बालकामगारात रूपांतर व भवितव्य अंधःकारमय, एकीकडे बालकामगार समस्या विश्वव्यापी, तर दुसरीकडे नवीन आर्थिक धोरणाच्या नियमनांच्याविरुद्ध बालकामगारांचा वापर व अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम. एकीकडे जागतिक महासत्तेचे स्वप्न तर दुसरीकडे

असंख्य समस्या व विषमतेवर आधारित विकास त्यामुळे उद्‌भवणाऱ्या समस्या भीषण रूप धारण करून देशाचा आर्थिक व सामाजिक विकास कॅन्सरग्रस्त करत आहेत आणि याच समस्यांमध्ये उपरोक्त चर्चा केलेल्या बालकामगारांची समस्या सामाजिक समस्येचे रूप धारण करून देवाघरच्या फुलांना शोषित वर्ग बनवत आहे.

प्रस्तुत शोध निबंधात बालकामगार का? बालकामगार, बालकामगारामुळे अर्थव्यवस्थेवरील परिणाम, बालकामगारांची व्याप्ती व स्वरुप, भारतात बालकामगारांचे प्रमाण, बालकामगार कायदे या सर्व घटकांची चर्चा प्रस्तुत शोध निबंधात केली आहे.

**बालकामगारांचे स्वरुप :**

बालकामगारांच्या कामाचे स्वरुप विविध उद्योग व्यवसायामध्ये व्यापक आहे. बालकामगारांची समस्या ही विश्वव्यापी असल्यामुळे त्यांच्या कार्याचे स्वरुप देखील भिन्न आहे. विशेषतः अल्पविकसित व विकसनशील देशातील कृषी क्षेत्रात बालकामगार समस्येचे स्वरुप गंभीर बनले आहे. परंतु सर्वसाधारणपणे धोकादायक आणि बिगर धोकादायक उद्योग व्यवसायांमध्ये बालकामगार काम करतात. त्यामध्ये आगपेटी, फटाका उद्योग, खोदकाम, वीटभट्टी, कत्तलखाना, काचकाम, विडी, सिगारेट, बांधकाम, हॉटेल, गॅरेज, मोटार वाहतूक, अगरबत्ती, पेट्रोल पंप, दुकान, मातीकाम, घरकाम, रद्दी विकणे, चिंध्या व भंगार गोळा करणे, पेपर टाकणे, ब्रेड विक्री करणे, बुट पॉलिश, यंत्रमाग, हातमाग, हमाली, छापखाना, रंगरंगोटी, होजिअरी, कुलपे तयार करणे, गालिचे विणणे, खड्यांना पॉलिस करणे, टाईल्स उद्योग, इत्यादी अनेक उद्योग- व्यवसायांमध्ये बालश्रमिक काम करताना दिसून येतात. त्यामुळे त्यांच्या कार्याचे स्वरुप व्यापक बनले आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्टे :**

१) जागतिक, भारत व महाराष्ट्रातील बालकामगारांचा अभ्यास करणे.
२) बालकामगार निर्मितीच्या कारणांचा शोध घेणे.
३) बालकामगार कायदे व बालकामगार समस्यांचा परिणाम अभ्यासणे.
४) बालकामगार निर्मुलनासाठी उपाय सूचविणे.

**संशोधन पध्दत :** प्रस्तुत शोध निबंध हा दुय्यम स्रोतावर आधारित असून त्यासाठी अनवेषणात्मक आराखड्याचा वापर केला असून दुय्यम स्रोतासाठी लागणारी माहिती, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, मासिके व शासकीय अहवालापासून उपलब्ध केली आहे.

**बालकामगारांची व्याख्या :**

**आंतरराष्ट्रीय श्रम संघटना :** "ज्या मुलांवर सतत प्रौढ व्यक्तींची जबाबदारी असते, जी मुले त्यांच्या शारीरिक व मानसिक विकासाला मारक ठरेल अशा वातावरणात कमी मोबदल्यात काम करतात, जी मुले आपल्या कुटुंबाला दुरावलेले असतात, जी



मुले स्वतःच्या उज्वल भविष्यासाठी आवश्यक ठरेल अशा शिक्षण-प्रशिक्षणास पारखी झालेली असतात. अशा सर्व मुलांना आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने बालकामगार संबोधले आहे."

**भारतीय राज्यघटना :** "ज्या व्यक्तींनी आपल्या वयाची १४ वर्षे पूर्ण केलेली नाहीत अशा सर्व कामगारांना बालकामगार असे म्हणतात."

**होमर फोक्स :** "मुलांच्या पूर्ण शारीरिक विकासात त्यांच्या किमान अपेक्षित शिक्षण घेण्याच्या संधीत किंवा त्यांना आवश्यक असलेल्या मनोरंजनाच्या कामात अडसर निर्माण करणारे कोणतेही काम मुले करीत असतील तर त्यांना बालकामगार असे म्हणतात."

**कॅम्पेन अगेन्स्ट चाईल्ड लेबर :** "लहान वयातील मुलांना प्रौढ व्यक्तीसारखी भूमिका बजावावी लागते. शारीरिक, भावनिक आणि नैतिक विकासाला मारक परिस्थितीत सवेतन किंवा विनावेतन काम करावे लागते, अशा काम करणाऱ्या मुलांना बालकामगार असे म्हणतात."

**अमेरिकन राज्यघटना :** "ज्या व्यक्तींनी आपल्या वयाची १२ वर्षे पूर्ण केलेली नाहीत अशा सर्व कामगारांना बालकामगार असे संबोधले जाते."

**जागतिक स्तरावर बालकामगारांचे प्रमाण :**

"बालकामगार ही विश्वव्यापी समस्या आहे. प्रत्येक देशात ही समस्या उफाळून येत आहे. भारत, चीन, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका इत्यादी देशात बालकामगारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आढळून येते. खंडनिहाय विचार केला तर जागतिक स्तरावर आशिया खंडात सर्वात जास्त बालकामगार आहे. जागतिक श्रम संघटनेच्या अभ्यासानुसार ५ ते १४ वर्षे वयोगटातील ६० टक्के बालकामगार आशिया खंडातील आहे. जागतिक स्तरावर बालकामगारांची संख्या किती आहे याचे चित्र खालील तक्त्यावरून स्पष्ट होईल."

**तक्ता क्र. १ : बालकामगारांची जागतिक संख्या**

| अ.क्र. | बाबी | संख्या (दशलक्ष) |
|---|---|---|
| १ | अर्थार्जन करणारी मुले | २१०.८ |
| २ | बालकामगार | १८६.३ |
| ३ | धोकादायक व्यवसायात काम करणारी मुले | १११.३ |
| ४ | बिगर धोकायदायक व्यवसायात काम करणारी मुले | ७५.० |

संदर्भ -यशदा संदर्भ साहित्य.

उपरोक्त तक्त्यावरून असे दिसून येते की, जागतिक स्तरावर बालकामगारांचे प्रमाण १८६.३ दशलक्ष तर धोकादायक व्यवसायात काम करणाऱ्या बालकामगारांचे प्रमाण १११.३ दशलक्ष व अर्थार्जन करणाऱ्यांचे प्रमाण २१०.८ दशलक्ष आणि बिगर धोकादायक व्यवसायात काम करणाऱ्या मुलांचे प्रमाण फक्त ७५.० दशलक्ष आहे. अर्थात जागतिक भविष्य धोक्यात आहे.

**भारतीयस्तरावर बालकामगारांचे प्रमाण :**

भारत हा असा देश आहे की, ज्याठिकाणी पाच मुलांपैकी एक बालकामगार व जगापैकी १/३ बालकामगार म्हणजेच तरूणाचा देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारताला येणाऱ्या काळात बालकामगारांचा देश म्हणून ओळखले जाईल. भारतातील बालकामगारांची संख्या अतिशय चिंताजनक बाब आहे. वर्तमान स्थितीत त्यावर योग्य उपाय करण्यात आले नाही तर भारताचे भवितव्य अंधकारमय आहे. भारतातील बालकामगारांची संख्या खालील तक्त्यावरून स्पष्ट होईल.

**तक्ता क्र. २ : भारतात बालकामगारांचे प्रमाण (१९७१-२००१)**

| अ. क्र. | राज्य | जनगणना वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
| १ | आंध्रप्रदेश | २६२७४९२ | १९५१३१२ | १६६१९४० | १३६३३३९ |
| २ | आसाम | २३९३४५ | उ. ना. | ३२९५९८ | ३५१४१६ |
| ३ | बिहार | १०५९३५९ | ११०१७६४ | ९४२२४५ | १११७५०० |
| ४ | गुजरात | ५१८०६१ | ६१६९१३ | ५२३५८५ | ४८५५३० |
| ५ | हरियाणा | ३७८२६ | १९४१८९ | १०९६९१ | २५३४९१ |
| ६ | जम्मू-काश्मीर | ७०४८९ | २५८४३७ | उ. ना. | १७५३६० |
| ७ | कर्नाटक | ८०८७१९ | ११३१५३० | ९७६२४७ | ८२२६१५ |
| ८ | केरळ | १११८०१ | ९२८५४ | ३४८०० | २६१५३ |
| ९ | मध्यप्रदेश | १११२३१९ | १६९८५९७ | १३५२५६३ | १०९५२५४ |
| १० | महाराष्ट्र | ९३८३५७ | १५५७७५६ | १०६८४२७ | ७६४०७५ |
| ११ | छत्तीसगढ | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | ३६४५७२ |
| १२ | मणिपूर | १६३८० | २०२१२ | १६४९३ | २८८३६ |
| १३ | मेघालय | ३०४४० | ४४९१६ | ३४६३३ | ५३९४० |
| १४ | झारखंड | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | ४०७२०० |
| १५ | उत्तरांचल | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | ७०१८३ |
| १६ | नागालँड | १३७२६ | १६२३५ | १६४२७ | ४५८७५ |
| १७ | ओरिसा | ४९२४७७ | ७०२२९३ | ५२३९४ | ३७७५९४ |
| १८ | पंजाब | २३२७७४ | २१६९३९ | १४२८३८ | १७७२६८ |
| १९ | राजस्थान | ५८७३७९ | ८१९६०५ | ७७४१९९ | १२६२५७० |
| २० | सिक्कीम | १५६६१ | ८५६१ | ५५९८ | १६४५७ |
| २१ | तामिळनाडू | ७१३३०५ | ९७५०५५ | ५७८८८९ | ४१८८०१ |
| २२ | त्रिपुरा | १७४९० | २४२०४ | १६४७८ | २१५७५६ |
| २३ | उत्तरप्रदेश | १३२६७२६ | १४३४६७५ | १४१००८६ | १९२७९५७ |
| २४ | पं. बंगाल | ५११४४ | ६०५२६३ | ७११९१ | ८५७०८७ |
| २५ | अंदमान-निकोबार | ५७२ | १३०९ | १२६५ | १९६० |
| २६ | अरूणाचल प्रदेश | १७९२५ | १७९५० | १२३९५ | १८४८२ |
| २७ | चंदिगड | १०४६ | १९८६ | १८७० | ३७३९ |
| २८ | दादर नगर हवेली | ३१०२ | ३६१५ | ४४१६ | ४२७४ |
| २९ | दिल्ली | १७१२० | २५७१७ | ३७३५१ | ४१७९९ |
| ३० | दीव-दमण | ७३९१ | १३७८ | ९४१ | ७२९ |
| ३१ | गोवा | उ. ना. | उ. ना. | ४६५६ | ४१३८ |
| ३२ | लक्षद्विप | ९७ | ५६ | ३४ | २७ |
| ३३ | मिझोरम | उ. ना. | ६३१४ | १६४११ | २६२६५ |
| ३४ | पॉंडेचरी | २७२५ | ३६०६ | २६८० | १९०४ |
| | एकूण | १०७५३९८५ | १३६४०८७० | ११२८५३४९ | १२६६६३७७ |

संदर्भ - योजना, मे २००८

टीप – उ. ना. = उपलब्ध नाही.

उपरोक्त तक्त्यावरून असे दिसून येते की, सन १९७१ ते २००१ या कालावधीत बालकामगारांची संख्या वाढत गेली आहे. २००१ च्या आकडेवारीनुसार भारतात १२.६ दशलक्ष बालकामगार आहेत. भारतात सर्वात जास्त बालकामगारांचे प्रमाण उत्तरप्रदेश, हरियाणा, आंध्रप्रदेश, राजस्थान, बिहार, मध्यप्रदेश, गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू, पं. बंगाल, महाराष्ट्र, इत्यादी राज्यात दिसून येते. तर कमी प्रमाण केरळ, लक्षद्विप, पॉंडेचरी, मणीपूर, मेघालय, छत्तीसगड, अंदमान-निकोबार,

अरुणाचल प्रदेश, दिल्ली, दादर-नगरहवेली, नागालँड, सिक्कीम, इत्यादी राज्यात आहे. कारण सदर राज्ये आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि साक्षरता प्रसार यामुळे या राज्यात बालकामगारांचे प्रमाण कमी आहे.

**व्यवसायनिहाय बालकामगारांचे प्रमाण :**

भारतातील बालकामगारांच्या संदर्भात वेगवेगळ्या संस्थांनी अभ्यास केलेला आहे. त्यापैकी चिल्ड्रन्स ऑफ डार्कनर या संस्थेच्या अभ्यासावरून भारतात वेगवेगळ्या व्यवसायात काम करणाऱ्या बालकामगारांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र. ३

**व्यवसायातील बालकामगारांची संख्या**

| अ.क्र. | व्यवसाय | स्थळ | संख्या |
|---|---|---|---|
| १ | काड्याच्या पेटी व फटाके | शिवकाशी | ८०,००० |
| २ | दगडाच्या खाणी | मलकापूर, मंदसौर | २०,००० |
| ३ | खाणी | मेघालय | २८,००० |
| ४ | हातमाग | त्रिवेंद्रम | १०,००० |
| ५ | होजिअरी | तिलपूर | ४०,०० |
| ६ | कुलूप बनविणे | अलिगड | १०,००० |
| ७ | गालीचे विणणे | जम्मू-काश्मीर | १,५०,००० |
| ८ | काच | फिरोजपूर | ५०,००० |
| ९ | मातीची भांडी बनविणे | खुर्जा | ५,००० |
| १० | खड्यांना पॉलिश करणे | जयपूर | २३,००० |
| | एकूण | | ३,७०,००० |

संदर्भ - अर्थविचार, २०१२.

उपरोक्त तक्त्यावरून असे दिसून येते की, १० व्यवसायात या संस्थेने केलेल्या पाहणीवरून एकूण ३,७०,००० बालकामगार आढळून आले आहे. गालीचे विणणे या व्यवसायात सर्वाधिक बालमजूर आढळून आले आहे. त्यानंतर काड्याच्या पेट्या व फटाके, काच व्यवसाय, खाण व्यवसाय, दगडाच्या खाणी इत्यादी व्यवसायात मोठ्या प्रमाणात बालमजूरांची संख्या आहे.

अर्थात भारताच्या जन्नतसारख्या काश्मीरमध्ये नरकाचा अनुभव घेणारे बालकामगार जास्त आहेत.



**भारतातील महिला बालकामगारांचे प्रमाण :**

भारतातील बाल्यअवस्था इतकी वाईट आहे की, मुलांसोबत मुलीही काम करताना दिसून येतात. ५ ते १४ या वयोगटात किती मुले आणि मुली काम करतात. याचे स्पष्टीकरण खालील तक्त्यात देण्यात आले आहे.

तक्ता क्र. ४

**भारतातील महिला बालकामगार (२००१)**

| भाग | वय | मुख्य कामगार | | | सिमांत कामगार | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्त्री | पुरुष | एकूण | स्त्री | पुरुष | एकूण |
| एकूण | ५ ते ९ | ३१२९३९ | ५०७१११ | ८२००५० | ५३४८७८ | ४९४७५२ | १०२९६३० |
| ग्रामीण | | २५८४५५ | ३९८५७८ | ६५७०३३ | ५०५८५९ | ४६०१३४ | ९६५९९३ |
| शहरी | | ५४४८४ | १०८५३३ | १६३०१७ | २९०१९ | ३४६१८ | ६३६३७ |
| एकूण | १० ते १४ | १८६९१४८ | ३०८९७९३ | ४९५८९४१ | ३१४५०७६ | २७१२६८० | ५८५७७५६ |
| ग्रामीण | | १६३७४४३ | २५८७९८४ | ४२२५४२७ | ३०१८७६८ | २५३७७३२ | ५५५६५०० |
| शहरी | | २३१७०५ | ५०१८०९ | ७३३५१४ | १२६३०८ | १७४९४८ | ३०१२५६ |

संदर्भ -Statistics on Women in India-2010

उपरोक्त तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, भारतातील बालकामगार व महिला बालकामगारांची किती वाईट स्थिती आहे. अरक्षश: खेळण्याच्या वयात अर्थात ५ ते ९ या वयोगटात मुख्य कामगारातील मुलींचे प्रमाण २६.२६ तर मुलांचे प्रमाण ७३.७४ टक्के आहे. तर सिमांत कामगारांतील मुलींचे प्रमाण ५२ टक्के तर मुलांचे प्रमाण ४८ टक्के आहे. १० ते १४ या वयोगटात मुलींचे प्रमाण २९.२९ टक्के तर मुलांचे प्रमाण ६१ टक्के आहे. सिमांत कामगारात मुलींचे प्रमाण ५३ टक्के तर मुलांचे प्रमाण ४७ टक्के आहे.

अर्थात, मुख्यकामगारांपेक्षा सीमांत कामगारात मुलांपेक्षा मुलींची संख्या जास्त व हे प्रमाण शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात जास्त आहे. म्हणजेच आजही ग्रामीण क्षेत्रातील दारिद्र्याची कल्पकता येते.

**महाराष्ट्रातील बालकामगारांचे प्रमाण -**

महाराष्ट्र राज्य हे औद्योगिकदृष्ट्या पुढारलेले राज्य आहे. भारतात महाराष्ट्राचा मानवी विकासात चौथा क्रमांक लागतो. शिक्षणाच्या बाबतीतही महाराष्ट्राने चांगली प्रगती केली आहे. एक पुरोगामी व सहकार राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. परंतु दुसऱ्या बाजूला महाराष्ट्र राज्यात बालकामगारांचे जास्त प्रमाण आहे हे विकासातील विषमतेच निर्देशक आहे. महाराष्ट्रात बालकामगारांचे प्रमाण खालील तक्त्यावरून स्पष्ट होईल.

तक्ता क्र. ५

महाराष्ट्रातील बालकामगार एक दृष्टिक्षेप

| अ. क्र. | मुद्दे/बाबी | संख्या |
|---|---|---|
| १ | १९८१ मध्ये बालकामगारांचे प्रमाण | १.५९ (दशलक्ष) |
| २ | १९९१ मध्ये बालकामगारांचे प्रमाण | १.०७ (दशलक्ष) |
| ३ | २००१ मध्ये बालकामगारांचे प्रमाण | ०.७६ (दशलक्ष) |
| ४ | १० ते १४ वयोगटातील मुली (२००१) | ३२३७७३ |
| ५ | ग्रामीण भागात | २९६९९१ |
| ६ | राज्यात सर्वात जास्त बालकामगार विभाग | मराठवाडा |
| ७ | मराठवाड्यात सर्वात जास्त बालकामगार | नांदेड (११४२८७) |

संदर्भ : अर्थविचार २०११

उपरोक्त तक्त्यावरून असे दिसून येते की, महाराष्ट्रात सन १९८१ ते २००१ या काळात बालकामगारांचे प्रमाण कमी झाले आहे. परंतु मुलींचे प्रमाण ४२ टक्के असल्यामुळे हे फार चिंतेची बाब आहे. मराठवाडा हा महाराष्ट्रात मागासलेला असताना सर्वात जास्त बालकामगार हे मराठवाड्यात आहे. म्हणजेच मराठवाडा हा खरोखरच मागासलेला दिसून येतो तर मराठवाड्यात सर्वात जास्त बालकामगार नांदेड या जिल्ह्यात दिसून येतात.

**बालकामगार कायदे :** भारतात बालकामगार निर्मुलनासाठी शासनाने विविध कायदे व समित्यांची स्थापना केली. परंतु प्रत्यक्षात काही अंशीच या कायद्यामुळे फलनिष्पत्ती झाली आहे. कायदे पुढीलप्रमाणे -

१) बालमजूरी संदर्भात घटनात्मक तरतूदी (कलम २४,४५,३९ई, ३९ फ)
२) बालकामगार प्रथा (प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा १९८६
३) वेठबिगारी निर्मुलन कायदा १९७६
४) प्रशिक्षणार्थी कायदा १९६१
५) फॅक्टरी अॅक्ट १९४७
६) माईन अॅक्ट १९५२
७) किमान वेतन कायदा १९४८
८) मोटार ट्रान्सपोर्ट अॅक्ट १९८१
९) प्लान्टेशन लेबर अॅक्ट १९५१
१०) शॉप-अॅण्ड कमर्शियल एस्टाब्लिसमेंट अॅक्ट १९३१
११) भारतीय बंदर कायदा १९३१



१३) जे.जे. अॅक्ट १९९३

**बालकामगार निर्माण होण्यास जबाबदार घटक :**

बालकामगार ही एक सामाजिक समस्या आहे. परंतु ही निर्माण होण्यासाठी आर्थिक व सामाजिक अशी दोन्ही घटक कारणीभूत ठरतात. ते खालील प्रमाणे-

१) वाढती लोकसंख्या　२) वाढते दारिद्र्य व बेरोजगारी
३) वाढती निरक्षरता　४) कमी दिले जाणारे वेतन
५) कौटुंबिक अडचणी　६) कायद्याचे उल्लंघन
७) विभक्त कुटुंब पध्दती　८) स्थलांतर प्रियता
९) बालवेश्या व्यवसाय　१०) निराधार मुले
११) किमान वेतनानुसार पालकांना वेतन नाही,
१२) पालकांची शिक्षणाबद्दलची अनास्था, १३) शिक्षणाच्या अपुऱ्यासोयी
१४) पारंपरिक कौशल्ये आत्मसात करणे, १५) लिंग भेदभाव
१६) नैसर्गिक संकटामुळे होणारे स्थलांतर, १७) वाढती महागाई
१८) आजारपण/अपघात

उपरोक्त सर्व कारणामुळे बालकामगार समस्या निर्माण होते.

**बालकामगार समस्येचे परिणाम :** बालकामगार ही अशी समस्या आहे की, ज्यामुळे अर्थव्यवस्थेवर विविध परिणाम होतात.

१) बालकामगारांच्या सहयोगाने निर्मित वस्तू आंतरराष्ट्रीय बाजारपेठात नाकारल्या जातात.
२) आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जा खालवतो.
३) देशाचा शैक्षणिक विकास खुंटतो.
४) सामाजिक प्रगती नाही.
५) देशातील आरोग्यविषयक समस्या वाढतात.
६) व्यसनाधिनता वाढते.
७) कौटुंबिक परिणाम होतात/रॅचेट इफिकेट
८) वेश्याव्यवसायात वाढ
९) बालकांचा लैंगिक छळ
१०) देशाचे भवितव्य अंधकारमय, अर्थात मानव विकास कमी

**बालकामगार निर्मुलनासाठी उपाय -**

१) बालकामगार निर्मुलनासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज
२) मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून बालकामगारांच्या पालकांची जागृती.
३) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिक करून शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे.

४) बालकामगार कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी
५) दारिद्र्य निर्मुलन करणे
६) बालमजूरी प्रथा संदर्भात समाजामध्ये जागृती निर्माण करणे.
७) जाहिरातीच्या माध्यमाने बालकामगारविरोधी मोहिम उघडणे आवश्यक आहे.
८) शासनाने बालकामगारांची वास्तव स्थिती लक्षात घेऊन बालकामगार निर्मुलनसाठी निधी वाढवून विविध योजनांमार्फत बालकामगार निर्मुलन करावे.

**सारांश :** देशाचे भवितव्य ज्या मुलांच्या हातात आहे. त्यांचेच भवितव्य अंधकारमय आहे. कायद्याची रचना व प्रसारमाध्यमांद्वारे केलेल्या जाहिराती व यातून समाज जागृती असे समीकरण घेऊन शासन निवडणूकीच्या मैदानात विविध घोषणा देत आहे. परंतु बालकामगार निर्मुलन झाले का? काही अंशी हो परंतु तेही विषमता आधारित. त्यामुळे देशाचा मानवी विकास कितपत साधता येईल याबाबत शंका आहे. म्हणून शासनाच्याच प्रयत्नाची वाट न बघता या देशातील प्रत्येक जबाबदार नागरिकाने बालकामगार विरोधी सामाजिक जागृती करून बालकामगार समस्या नष्ट करावी.

**संदर्भ सूची :**

१) तेलतुम्बडे आनंद (२००७) : "एकविसाव्या शतकातील भारत उन्माद आणि आव्हाने," प्रकाशन लोकवाङ्मय गृह, मुंबई.
२) कांबळे नारायण (२०११) : "मानवी अधिकार : दलित व वास्तव लेख," भाषा राजकारण आणि विकास या संपादकीय पुस्तकात, चिन्मय पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
३) बारबोले टी.एल. (२०११) : "भारतातील बालकामगार समस्या : एक विश्लेषणात्मक अभ्यास," लेख अर्थविचार या मासिकांत, खंड-१ अंक१, प्रकाशन, नांदेड.
४) भुसारे दीपक (२०१२) : "भारतातील वाढत्या बालमजूरीचा चिकित्सक अभ्यास," लेख अर्थविचार या मासिकात, खंड-१, अंक-१, प्रकाशन नांदेड.
५) संदर्भ साहित्य (२००५) : "यशवंतराव चव्हाण," विकास प्रकाशन प्रबोधिनी, पुणे.
६) महाराष्ट्र शासन (२००८):"भारतीय राज्यघटना," प्रकाशने मुंबई.
७) योजना (२००८) : "सांख्यिकीय पुरवणी," प्रकाशन मुंबई.
८) जोशी अंजली (२००५):"बालकामगार समस्या,"कैलास प्रकाशन,औरंगाबाद.
9) Tyagi B.P. (1996): "Labour Economics and Social Welfare," Jaiprakash Nath Publication, New Delhi.
10) National Institute (2011) : "Statistics on Women in India 2010," Oxford Press, New Delhi.

❖❖❖



# महिला सक्षमीकरणात बचतगटाची भूमिका

तौर बाळासाहेब विठ्ठलराव
संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
E-Mail ID:- balrajetaur100@gmail.com Mob. No.-9765075163

**प्रस्तावना :**

जगातील प्रत्येक देशात समाज व राष्ट्राच्या विकासातील एक महत्वाचा घटक म्हणजे महिला आहेत. तरीही जगभरातील महिला आजही उपेक्षित जीवन जगत आहेत. भारतीय समजाव्यवस्थेचा विचार केला असता भारतीय महिला विकासाच्या प्रक्रियेपासुन खुप दुर असल्याचे दिसुन येतात. भारतीय पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने या ना त्या कारणास्तव त्यांना विकास प्रक्रियेपासून दुर ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेने महिलांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा दिलेला आहे. तसेच भारताने आपले आर्थिक धोरण राबवितांना पुरूषाप्रमाणेच महिलांनाही समान संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. असे असले तरीही आज भारतीय महिला सामाजिक आर्थिक, शैक्षणिक व राजकिय या सारख्या सर्वच क्षेत्रात पुरूषांच्या तुलनेत मागास असल्याच्या दिसुन येतात.

जागतिकिकरणाच्या युगात महिलांना आजही दुय्यम स्थान दिले जाते. शहरी भागात हे प्रमाण असुन ग्रामीण भागात आजही अतिशय विदारक दृश्य पहावयास मिळते. महिलांच्या दुय्यम स्थितीमुळे वर्तमानकाळात महिलांच्या विकासासाठी जगभर अनेक चळवळी, आंदोलने, धोरणे व विविध योजना राबविल्या जात आहेत. यापैकीच महिला बचतगट ही एक महत्वपुर्ण योजना आहे. महिला बचतगटामुळे महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थितीत सुधारणा होत आहे, त्यांच्या नेतृत्व गुणांचा विकास होऊन राजकिय सहभाग वाढला आहे. त्यांच्यात सचोटी, मेहनत करण्याची प्रवृत्ती, आत्मविश्वास वाढुन त्यांचे सामाजिक सक्षमीकरण झाले आहे. म्हणुन प्रस्तुत शोधनिबंध महत्वाचा आहे.